# ४. मोगल साम्राज्याचा संक्षिप्त इतिहास

**प्रश्न १ ला :-** बाबराच्या कामगिरीचे वर्णन करून त्याची योग्यता स्पष्ट करा.

**उत्तर :-** बाबराच्या आक्रमणाच्या वेळचा भारत :-

१) मुस्लिम प्रभावाचा उत्तर पट्टा :-

यात सिंध, काश्मीर, पंजाब, दिल्ली, जौतपूर, बंगाल इत्यादी राज्ये येतात.

२) मुसलमानी प्रभावाचा दक्षिण पट्टा :-

यात गुजरात, माळवा, खानदेश, बहामनी इत्यादी राज्यांचा समावेश होतो.

३) हिंदू प्रभावाचा पट्टा :-

यात विजयनगर, ओरिसा, राजपुताना इत्यादी राज्ये मोडत.

**बाबराचे आक्रमण व मोगल साम्राज्याची स्थापना :-**

बाबराचा जन्म १४ मे १४८३ मध्ये आशिया खंडातील फरघना प्रांताची र अन्दिजान येथे झाला. त्याचा बाप उमरशेख मिर्झा हा फरघना प्रांताचा रा बाबर १२ वर्षांचा असताना त्याचा बाप मृत्यू पावला. त्यामुळे तो बाराव्या वर्षी राजा झाला.

बाबर हा तैमुरलंग आणि चंगीझखानच्या घराण्याशी संबंधित असल्यामुळे

मनात साम्राज्य स्थापन करण्याची आणि जगात नाव प्राप्त करण्याची दुर्दम्य महत्त्वाकांक्षा होती. त्याला वयाच्या बाराव्या वर्षापासून सतत अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. फरघना समरकंद भागात सतत अस्थिरता होती. त्याने इ.स. १५०४ मध्ये काबूल जिंकले. इ.स. १५०७ मध्ये त्याने स्वत:ला बादशहा असा किताब धारण केला. काबूलची गादी मिळविल्यानंतर त्याने भारतावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. इ.स. १५१९ ते इ.स. १५२६ या कालखंडात एकंदर पाच स्वाऱ्या केल्या. शेवटच्या स्वारीत त्याने इब्राहीमखान लोदीचा पराभव करून दिल्लीची सत्ता हस्तगत केली.

**पानिपतची पहिली लढाई (२१ एप्रिल १५२६):-**

बाबर आणि इब्राहीमखानच्या सैन्याने पानिपतच्या रणांगणावर एकमेकांसमोर तळ दिला होता. इब्राहीमखानचे सैन्य ४० हजार तर बाबराचे सैन्य २५ हजारपेक्षा कमी नसावे. बाबराजवळ सुसज्ज तोफखाना आणि राखीव सैन्याची तुकडी होती. बाबराच्या सैन्यात शिस्त होती तर इब्राहीमखान लोदीच्या सैन्यात शिस्तीचा अभाव होता. बाबराने इब्राहीमखानच्या चारी बाजूंनी तोफांचा भडिमार केला व पठाण सैन्याचा प्रचंड संहार केला. दुपारपर्यंत घनघोर लढाई होऊन बाबराचा विजय झाला. पानिपतच्या लढाईने दिल्लीच्या पठाणांची सत्ता संपुष्टात येऊन दिल्ली-आग्र्याचे राज्य मोगलांच्या ताब्यात गेले. डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतात त्याप्रमाणे, "पानिपतच्या लढाईने बाबर दिल्लीच्या साम्राज्याचा मालक बनला. इब्राहीमखान लोदी घराण्याची सत्ता नष्ट होऊन हिंदुस्थानचे राज्य छगताई वंशाच्या तुर्कांकडे गेले. अशा रीतीने बाबराच्या ताब्यात पंजाबपासून आग्र्यापर्यंतचा प्रदेश आला.

पानिपतच्या युद्धानंतर बाबराचे सैन्य मायभूमीकडे जाण्यास उत्सुक होते तरी त्याने आपल्या सैन्यासमोर मोठे उत्साहपूर्ण भाषण करून भारतात साम्राज्य प्रस्थापित करण्यासाठी व हिंदूंना धडा शिकविण्यासाठी त्याने सैन्यास येथेच राहण्यास प्रवृत्त केले. नंतर बाबराने संभल, इटावा, कनौज, जोनपूर, गाझीपूर, ग्वाल्हेर इत्यादी ठाणी जिंकून घेतली. नंतर त्याने आपले लक्ष राजस्थानकडे वळविले.

**बाबर आणि राणासंग:-**

बाबरच्या वेळी मेवाडमध्ये राजपूत राजा राणासंग हा राज्य करीत होता. बाबराच्या ही बाब लक्षात आली की, राणासंगाचा पराभव केल्याशिवाय हिंदुस्थानमध्ये आपली सत्ता टिकणार नाही. भारतात हिंदूंचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची आकांक्षा राणासंगाच्या मनात होती. तो एक शूर व कसलेला सेनापती होता. मोगलांची झुंज देण्यासाठी त्याने सर्व राजपुतांना आव्हान केले. राजस्थानमधील सर्व राजपूत राजांनी त्याच्या आव्हानास प्रतिसाद दिला. काही पठाण सरदारही त्याला येऊन मिळाले. ही लढाई फत्तेपूर सिक्रीजवळ खानुआ या ठिकाणी झाली.

**खानुआची लढाई (इ.स. १५२७):-**

बाबर आणि राणासंगाचे सैन्य समोरासमोर आले. राणासंगाचा अभूतपूर्व पराक्रम ऐकून मोगल सैन्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सैन्याचे मनोधैर्य वाढविण्यासाठी बाबराने ओजस्वी भाषण देऊन सैनिकांना धर्मयुद्धाचे (जिहाद) स्वरूप दिले. हा लढा

Scanned with OKEN Scanner

केवळ दिल्लीचे राज्य ताब्यात ठेवण्यासाठी नसून हा हिंदू-मुसलमानांचा लढा आहे आणि इस्लाम धर्माच्या प्रतिष्ठेसाठी प्रत्येक सैनिकाने प्राणपणाने लढावे, असे आवाहन केले. याच प्रसंगी त्याने दारू न पिण्याची शपथ घेतली. याचा परिणाम म्हणून बाबराच्या सैन्याने राजपुतांचा पराभव केला. आता हिंदुस्थानमधील बाबर राज्य निष्कंटक बनले.

खानुआच्या लढाईनंतर बाबराचे कार्यक्षेत्र काबूलऐवजी हिंदुस्थान बनले. नंतर त्याने चंदेरीचा राजपूत राजा मेदिनीरायचा पराभव केला. तसेच घोग्राच्या लढाईत इब्राहीमखान लोदीचा भाऊ महंमूद लोदी याच्याशी निकराची झुंज दिली व त्याचा पराभव केला.

**बाबराची योग्यता :-**

**(१) आदर्श व्यक्तिमत्व :-**

बाबर हा एक आदर्श पुत्र, आदर्श पिता, आदर्श पती, आदर्श मित्र होता. सतत कष्ट करणारा, दीर्घोद्योगी स्वभावाचा होता. त्याची शरीरयष्टी दणकट असून पोहणे, घोड्यावर स्वार होणे, कित्येक मैल पायी रपेट करणे, दोन्ही बगलेत एकेक माणूस घेऊन धावणे यांचा सराव तो सहज करीत असे.

**(२) साहसी योद्धा व कुशल सेनापती :-**

त्याच्यात साहसी वृत्ती, प्रचंड आत्मविश्वास, संघटन कौशल्य, कठोर परिश्रमशीलता आणि कमालीची सहनशीलता होती. त्याचे सैनिकांवर अजोड प्रेम होते, त्याने अनेक युद्धकला व युद्ध पद्धती आत्मसात केलेल्या होत्या. मध्ययुगीन काळात तोफखान्याचा यशस्वी प्रयोग करणारा पहिला आशियन सेनापती बाबर होय.

(३) बाबर हा महान विजेता आणि श्रेष्ठ साम्राज्य संस्थापक होता.

**(४) धर्मशील वृत्तीचा नेता :-**

बाबर हा सुन्नी पंथाचा कट्टर अनुयायी होता; परंतु महंमद गझनी किंवा तैमुरलंगप्रमाणे तो धर्मवेडा नव्हता. समरकंद जिंकल्यानंतर त्याने शिया पंथाचा स्वीकार केला. काही युद्धांत त्याने धर्मयुद्ध (जिहाद) ची घोषणा केली. दिल्ली सुल्तानशाहीच्या काळातील सुल्तानांपेक्षा त्याचे धार्मिक धोरण उदार असल्याचे दिसून येते.

**(५) सामान्य कुवतीचा प्रशासक :-**

भारतात त्याने कोणत्याही नवीन प्रशासनाची सुरुवात केली नाही.

**(६) मुत्सद्दी राजनीतिज्ञ :-**

आपले खरे मित्र व शत्रू ओळखण्याची त्याला उत्तम पारख होती. त्याच्यावर आक्रमण करणाऱ्या दौलतखान लोदीला त्याने कैदेची शिक्षा दिली. तसेच इब्राहीमखान लोदीच्या सरदारांना आपापसात संघर्ष करण्यास उद्युक्त केले. प्रजेशी सलगी करण्याचा त्याने प्रयत्न केलेला नाही.

**(७) सुसंस्कृत विद्वान :-**

बाबर हा एक सुसंस्कृत विद्वान राजा होता. तुर्की व फारसी भाषेवर त्याचे प्रभुत्व होते. या दोन्ही भाषेतून त्याने दर्जेदार काव्यरचना केली. त्याचा 'दिवाणा' हा काव्यसंग्रह अप्रतिम समजला जातो. त्याने न्याय पद्धत व काव्याच्या छंदशास्त्रावरही लिखाण केल्याचे दिसून येते. बाबर संगीत ...

Scanned with OKEN Scanner

... राज्य ताब्यात ठेवण्यासाठी नसून हा हिंदू-मुसलमानांचा लढा आहे आणि इस्लाम धर्माच्या प्रतिष्ठेसाठी प्रत्येक सैनिकाने प्राणपणाने लढावे, असे आवाहन केले. याच प्रसंगी त्याने दारू न पिण्याची शपथ घेतली. याचा परिणाम म्हणून बाबराच्या सैन्याने राजपुतांचा पराभव केला. आता हिंदुस्थानमधील बाबर राज्य निष्कंटक बनले.

खानुआच्या लढाईनंतर बाबराचे कार्यक्षेत्र काबूलऐवजी हिंदुस्थान बनले. नंतर त्याने चंदेरीचा राजपूत राजा मेदिनीरायचा पराभव केला. तसेच घोग्राच्या लढाईत इब्राहीमखान लोदीचा भाऊ महंमूद लोदी याच्याशी निकराची झुंज दिली व त्याचा पराभव केला.

## बाबराची योग्यता :-

### (१) आदर्श व्यक्तिमत्व :-

बाबर हा एक आदर्श पुत्र, आदर्श पिता, आदर्श पती, आदर्श मित्र होता. सतत कष्ट करणारा, दीर्घोद्योगी स्वभावाचा होता. त्याची शरीरयष्टी दणकट असून पोहणे, घोड्यावर स्वार होणे, कित्येक मैल पायी रपेट करणे, दोन्ही बगलेत एकेक माणूस घेऊन धावणे यांचा सराव तो सहज करीत असे.

### (२) साहसी योद्धा व कुशल सेनापती :-

त्याच्यात साहसी वृत्ती, प्रचंड आत्मविश्वास, संघटन कौशल्य, कठोर परिश्रमशीलता आणि कमालीची सहनशीलता होती. त्याचे सैनिकांवर अजोड प्रेम होते, त्याने अनेक युद्धकला व युद्ध पद्धती आत्मसात केलेल्या होत्या. मध्ययुगीन काळात तोफखान्याचा यशस्वी प्रयोग करणारा पहिला आशियन सेनापती बाबर होय.

### (३) बाबर हा महान विजेता आणि श्रेष्ठ साम्राज्य संस्थापक होता.

### (४) धर्मशील वृत्तीचा नेता :-

बाबर हा सुन्नी पंथाचा कट्टर अनुयायी होता; परंतु महंमद गझनी किंवा तैमुरलंगप्रमाणे तो धर्मवेडा नव्हता. समरकंद जिंकल्यानंतर त्याने शिया पंथाचा स्वीकार केला. काही युद्धांत त्याने धर्मयुद्ध (जिहाद) ची घोषणा केली. दिल्ली सुल्तानशाहीच्या काळातील सुल्तानांपेक्षा त्याचे धार्मिक धोरण उदार असल्याचे दिसून येते.

### (५) सामान्य कुवतीचा प्रशासक :-

भारतात त्याने कोणत्याही नवीन प्रशासनाची सुरूवात केली नाही.

### (६) मुत्सद्दी राजनीतिज्ञ :-

आपले खरे मित्र व शत्रू ओळखण्याची त्याला उत्तम पारख होती. त्याच्यावर आक्रमण करणाऱ्या दौलतखान लोदीला त्याने कैदेची शिक्षा दिली. तसेच इब्राहीमखान लोदीच्या सरदारांना आपापसात संघर्ष करण्यास उद्युक्त केले. प्रजेशी सलगी करण्याचा त्याने प्रयत्न केलेला नाही.

### (७) सुसंस्कृत विद्वान :-

बाबर हा एक सुसंस्कृत विद्वान राजा होता. तुर्की व फारसी भाषेवर त्याचे प्रभुत्व होते. या दोन्ही भाषेतून त्याने दर्जेदार काव्यरचना केली. त्याचा 'दिवाण' हा काव्यसंग्रह अप्रतिम समजला जातो. त्याने न्याय पद्धत व काव्याच्या छंदशास्त्रावरही लिखाण केल्याचे दिसून येते. बाबर संगीत व निसर्गप्रेमी होता. त्याच्या आत्मचरित्रावरून त्याच्या